**<u>प्रेसनोट दि.२७/०४/२०१९</u>**

**सिंहगडरोड, पोलीस ठाणे पुणे**

**कम्युनिटी पोलीसींगचे अनुषंगाने सिंहगडरोड पो.स्टे. हद्दीतील न‍्हे गावातील रिक्षा चालक/मालकांना भेट देवुन जनजागृती**

---

दि. २६/०४/२०१९ रोजी दुपारी १२.०० वा. ते १३.०० वा. चे दरम्यान न-हे पोलीस चौकीचे प्रभारी अधिकारी सहा.पोलीस निरीक्षक, एस.डी.पाटील व पोलीस उप-निरीक्षक एस.एस.घाडगे व स्टाफ यांनी न-हे पोलीस चौकी अंतर्गत न-हे गावातील व पुणे शहरातील रिक्षाचालक यांची मिटींग घेवुन न-हे पोलीस चौकी येथे जमलेल्या रिक्षाचालकांना पुणे पोलीस आयुक्तालयाकडून कम्युनिटी पोलीसींग संदर्भात एकुण १४ ॲप/योजना कार्यान्वीत असून त्या संदर्भात माहीती सांगीतली. कम्युनिटी पोलीसींगचे अनुषंगाने खालील नमुद मुद्दयांवर मार्गदर्शक सुचना दिल्या.

१) वाहतुकीचे नियमांचे पालन करणे.
२) हद्दीमध्ये अवैद्यधंदे चालु असल्यास त्याची माहिती तात्काळ पोलीसांना देणे.
३) हद्दीमध्ये घरफोडी, जबरी चोरी, लुटमार, चैनस्नॅचींग इ. बाबत माहिती मिळताच तात्काळ पोलीसांना कळविणे.
४) वाहतुकीच्या दरम्यान जेष्ठ नागरीकांना व महिलांना योग्य ती मदत करणे.
५) हद्दीमध्ये कायदा व सुव्यवस्था प्रस्तापित राहील याची काळजी घेणे.
६) अपघाताच्या वेळी व वाहतुक कोंडीच्यावेळी लोकांना व पोलीसांना मदत करणे.
७) बँका, एटीएम व सोसायटयांमध्ये व परिसरात संशयीत व्यक्ती आढळुन आल्यास त्याची माहिती तात्काळ पोलीसांना देणे.
८) रिक्षामध्ये व आजुबाजुच्या परिसरात कोणतीही संशयीत वस्तु किंवा बॅग आढळुन आल्यास तात्काळ पोलीसांना माहिती देणे.

अशा प्रकारे वरील नमुद मुद्दयांवर माहिती देवुन सदर उपस्थित रिक्षा चालकांना कायदा व सुव्यवस्थेचा कोणताही प्रश्न उदभवल्यास कोणत्याही अडचणी आल्यास त्वरीत सिंहगडरोड पो.स्टे. अथवा १०० नंबरवर कॉल करुन पोलीस कंट्रोल रुम येथे कळवावे. आपल्या आजुबाजूस कोणी संशयीत व्येक्ती आढळल्यास ताबडतोब पोलीसांना कळविण्यात यावे. सदरबाबत योग्य ते मार्गदर्शन करण्यात आले. सदर मिटींगला एकुण १६ रिक्षा मालक/चालक हजर होते.

( डी.व्ही.पवार )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
सिंहगडरोड, पोलीस ठाणे पुणे